महाराष्ट्र शासन
आयुक्त राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय
जुने जकात घर, दुसरा मजला, फोर्ट, मुंबई - ४००.०२३.

वाचले:- या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक डिवायएस ११९२/६१४१४/२०४/चार दिनांक ७ नोव्हेंबर २००२

---

# परिपत्रक

क्रमांक डिवायएस ११९२/६१४१४/२०४/चार मुंबई, २३ ऑगस्ट २००२

एक्साईज ॲन्ड टॅक्सेसन कमिशनर हरियाणा, चंदिगड यांनी कळविले आहे की त्यांच्या राज्याच्या हद्दीतून (Transit) मद्य आणि मद्यार्क यांची वाहतूक करावयाची असल्यास सरहद्दीवरील जिल्हयातून आवश्यक तो परवाना प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. अशा परवान्याशिवाय मद्य किंवा मद्यार्काची वाहतूक केल्यास पंजाब एक्साईज ॲक्ट चे कलम ६१-ए अन्वये गुन्हा असून मद्य / मद्यार्क व वापरण्यात येणारे वाहन जप्त होऊन रु. २०,००० ते ३,००,००० पर्यंत दंडास पात्र आहे. सबब, सर्व विदेशी, मद्य बिअर व वाईन निर्मात्यांना तसेच एफएल-१ अनुज्ञप्तीधारकांना कळविण्यात येते की, त्यांनी उत्पादित केलेली मद्याची निर्यात किंवा एफएल-१ अनुज्ञप्ती धारकांना मद्याची आयात करावयाची असल्यास व सदर मद्याची आयात/निर्यात करताना मार्गातील वाहतूक हरियाणा राज्यातून होणार असल्यास सदर मद्य हरियाणा राज्यात प्रवेश करण्यापूर्वी सीमेवरील जिल्हयातील अधिका-यांकडून उचित परवाने प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी मद्य / बिअर / वाईन उत्पादकांची व एफएल-१ आयातदारांची राहील.

महाराष्ट्र व वर नमूद केल्याप्रमाणे अन्य कांही राज्यातही थ्रू ट्रान्सपोर्ट रुल्स/ ट्रान्झीट रुल्स / लिकर ट्रांझिट रुल्स / किंवा अन्य तत्सम नियम अस्तित्वात आहेत. सबब, राज्यातील मद्य /बिअर /वाईन निर्माते व आयातदार यांना कळविण्यात येते की, राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत आयात / निर्यात परवाने मंजूर केले तरी मार्गातील (Transit) ज्या राज्यातून मळी/ मद्य/ मद्यार्कांची वाहतूक करावयाची असेल त्या राज्यातील कायद्यातील तरतुदीनुसार थ्रू ट्रान्सपोर्ट परवाना / ट्रान्झीट स्लिप/ ट्रान्झीट परमीट प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी संबंधित मद्य निर्माता/ आयातदार / निर्यातदार यांचीच राहील.

सर्व आसवन्या/पीएलएल/बीआरएल/वायनरी/ब्रुअरी व एफएल-१ अनुज्ञप्तीधारक यांचे प्रभारी अधिकारी तसेच संबंधित अधीक्षकांना निर्देशित करण्यात येते की, त्यांच्या कार्यक्षेत्रातील घटकास आयात/ निर्यात परवाना मंजूर करताना सदर परवान्याच्या सर्व प्रतिवर पुढीलप्रमाणे मजकूर लिहिण्यात यावा व त्याची नोंद घेतल्याची सही सदर परवान्याच्या कार्यालय प्रतीवर घेण्यात यावी.

"मळी / मद्य / मद्यार्काची वाहतूक मार्गातील (transit) ज्या राज्यातून होणार आहे त्या राज्यातील कायदयाच्या आवश्यकतेनुसार थ्रु ट्रान्सपोर्ट परवाना किंवा ट्रांझिट पास किंवा अन्य तत्सम परवाना प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी परवाना धारकाची राहील."

सर्व अधीक्षकांनी उपरोक्त सूचना त्यांच्या कार्यक्षेत्रातील आसवन्या / पीएलएल/ बीआरएल/ व एफएल-१ अनुज्ञप्तीधारकांच्या निदर्शनास आणाव्यात तसेच आयात / निर्यात परवाने मंजूर करताना वर उल्लेख केल्याप्रमाणे नोंदी परवान्यावर घेण्यात याव्यात.

( ए. रामकृष्णन )
आयुक्त

प्रति,

१) सर्व जिल्हाधिकारी यांना सस्नेह.
२) या विभागाचे सहआयुक्त, (मळी/मद्यार्क) (प्रशासन)
३) सर्व विभागीय उपआयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, कोकण विभाग, ठाणे / पुणे विभाग, पुणे/ नागपूर विभाग, नागपूर/ औरंगाबाद विभाग, औरंगाबाद.
४) या कार्यालयातील सर्व उपआयुक्त
) सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क,
सर्व आसवन्या पीएलएल/बीआरएल/वायनरी/ब्रुअरी व एफएल-१ अनुज्ञप्तीधारक यांचे प्रभारी अधिकारी.
या कार्यालयातील सर्व कार्यासन अधिकारी.
या कार्यालयातील अभिलेख शाखा (५ प्रती).

हरिशाखा-परिपत्रक
दि. २.८.०२